खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

दैनिक

# अक्षराज

अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com




दैवी वास्तुकार,
सकळ सृष्टीचा निर्माता,
रक्षक आणि श्रुती धर्मा,
रचनाकार
भगवान श्री विश्वकर्मा
यांच्या जयंतीनिमित्त शुभेच्छा

वर्ष : ०५ | अंक : १६९, पाने : ०६, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, शनिवार, दि.३१ जानेवारी २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

# सुनेत्रा पवार होणार उपमुख्यमंत्री ?

## राष्ट्रवादीच्या आमदारांची आज मुंबईत बैठक



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.३०, मुंबई :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर राष्ट्रवादी काँग्रेसच्या गोटात हालचालींना वेग आला आहे. राष्ट्रवादीची धुरा कोणाकडे जाणार, उपमुख्यमंत्रिपदाची जबाबदारी कोण सांभाळणार, या प्रश्नांचा सोक्षमोक्ष लावण्यासाठी बैठकांचं सत्र सुरु आहे.

अजित पवार यांच्या पत्नी आणि राज्यसभेच्या खासदार सुनेत्रा पवार यांच्या नावासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आग्रही आहेत. त्यामुळे सुनेत्रा पवार राज्याच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री होतील, अशी चर्चा सुरु आहे. या सगळ्या चर्चांवर, शक्यतांवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पहिल्यांदाच भाष्य केलं आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसचे वरिष्ठ नेते असलेले प्रफुल पटेल, सुनील तटकरे, छगन भुजबळ यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची दोनदा भेट घेतली. काल आणि आज ही नेते मंडळी फडणवीसांना भेटली. त्यानंतर सुनेत्रा पवार उपमुख्यमंत्री होतील, या चर्चांना जोर धरला. अखेर फडणवीस यांनी या सगळ्यावर स्पष्ट शब्दांत भाष्य केलं. सुनेत्रा पवार राज्याच्या पहिल्या उपमुख्यमंत्री होणार का, असा प्रश्न फडणवीस यांना विचारण्यात आला. त्यावर हा निर्णय राष्ट्रवादी काँग्रेसचा आहे. राष्ट्रवादी काँग्रेसकडून या संदर्भात निर्णय घेतला जाईल. आम्ही त्या निर्णयाच्या पाठीशी असू. आम्ही त्यांना या संदर्भात पाठिंबा देऊ, असं फडणवीस म्हणाले.

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते माझ्याशी दोन वेळा चर्चा करुन गेले आहेत, अशी माहिती मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली. 'त्यांनी मला त्यांच्या पक्षाची कार्यपद्धती सांगितली. त्यांच्याकडे असलेल्या पर्यायांची सविस्तर माहिती दिली. या संदर्भात अंतिम निर्णय त्यांचा पक्ष घेईल,' असं फडणवीस यांनी सांगितलं. दुसरीकडे उद्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या आमदारांची बैठक बोलावली जाण्याची शक्यता आहे. या बैठकीत विधिमंडळ गटनेता निवडला जाऊ शकतो. अजित पवार विधिमंडळ गटाचे नेते होते. त्यांच्याचकडे पक्षाची धुरादेखील होती. त्यामुळे आता राष्ट्रवादीचं नेतृत्व कोण करणार आणि उपमुख्यमंत्री कोण होणार, याकडे राजकीय वर्तुळाचं लक्ष लागलं आहे.

अजित पवार यांच्याकडे अर्थ मंत्रालयाचा कार्यभार होता. त्यामुळे आता पुढील अर्थसंकल्प कोण सादर करणार, हा प्रश्न मुख्यमंत्री फडणवीस यांना विचारण्यात आला. त्यावर अजित दादांनी अर्थसंकल्पाची बरीच तयारी करुन ठेवलेली आहे. उद्यापासून मी त्या प्रक्रियेत लक्ष घालेन. अर्थसंकल्प कोणी सादर करायचा, ते नंतर ठरवू, असं फडणवीस म्हणाले.

# निवडणुका ५ ऐवजी ७ फेब्रुवारी २०२६ रोजी



**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.३०, मुंबई :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे राज्यात तीन दिवसांचा दुखवटा जाहीर करण्यात आला असल्यामुळे १२ जिल्हा परिषदा व त्यांतर्गतच्या १२५ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांच्या उर्वरित टप्प्यांमध्ये बदल करण्यात आला असून ५ फेब्रुवारी २०२६ ऐवजी आता ७ फेब्रुवारी २०२६ रोजी मतदान; तर ७ फेब्रुवारी २०२६ ऐवजी ९ फेब्रुवारी २०२६ रोजी मतमोजणी होईल.

राज्य निवडणूक आयोगाने या जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या निवडणुकांसाठी १३ जानेवारी २०२६ रोजी निवडणूक कार्यक्रम जाहीर केला होता. त्यानुसार नामनिर्देशनपत्र दाखल करणे, नामनिर्देशनपत्र मागे घेणे, चिन्ह वाटप आणि निवडणूक लढविणाऱ्या अंतिम उमेदवारांची यादी प्रसिद्ध करणे इत्यादी टप्प्यांच्यी प्रक्रिया पूर्ण झाली आहे. त्यापुढील मतदान, मतमोजणी आणि निवडून आलेल्या सदस्यांची नावे राजपत्रात प्रसिद्ध करणे हे टप्पे शिल्लक आहेत.

सर्वोच्च न्यायालयाने या निवडणुकांसाठी ३१ जानेवारी २०२६ च्या पुढे फक्त दोन आठवड्यांची मुदत वाढ दिली आहे; परंतु उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे २८ जानेवारी २०२६ रोजी अपघाती निधन झाल्यामुळे राज्य शासनाने राज्यात २८ जानेवारी २०२६ ते ३० जानेवारी २०२६ पर्यंत दुखवटा जाहीर केला आहे. या कालावधीचा विचार करून जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या निवडणुकांच्या कार्यक्रमातील उर्वरित टप्प्यांमध्ये बदल करण्यात आले आहेत. त्यानुसार संबंधित जिल्हाधिकारी सुधारित निवडणूक कार्यक्रमाची सूचना ३१ जानेवारी २०२६ रोजी प्रसिद्ध करतील. आता ७ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत मतदान होईल. त्यामुळे जाहीर प्रचाराची समाप्ती ५ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्री १० वाजता होईल. संबंधित ठिकाणी ९ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १० वाजता मतमोजणी सुरु होईल. निकाल जाहीर झाल्यानंतर संबंधित ठिकाणची आचारसंहिता संपुष्टात येईल. निवडून आलेल्या सदस्यांची नावे शासन राजपत्रात ११ फेब्रुवारी २०२६ पर्यंत प्रसिद्ध केली जातील.

# इनकम टॅक्समध्ये सवलत, नवीन रेल्वे गाड्या; अर्थसंकल्पात होऊ शकतात या मोठ्या घोषणा

संसदेचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सध्या सुरू आहे. आता संपूर्ण देशाचे लक्ष १ फेब्रुवारीला जाहीर होणाऱ्या अर्थ संकल्पाकडे लागलेले आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण नवव्यांदा अर्थसंकल्प सादर करणार आहेत. नेहमीप्रमाणे, या अर्थसंकल्पाकडून सामान्य जनतेला मोठ्या अपेक्षा असणार आहेत. आयकर, आरोग्य, वाहन, संरक्षण, रेल्वे आणि इतर क्षेत्रांसाठी या अर्थसंकल्पात काय घोषणा होऊ शकतात ते जाणून घेऊयात.

**● आयकर !**

यंदाच्या अर्थसंकल्पात सामान्य नागरिकांना आयकर सवलत मिळण्याची मोठी अपेक्षा आहे. नवीन कर प्रणालीमध्ये आधीच १२ लाख रुपयांची करमुक्त उत्पन्न मर्यादा आहे, मात्र वाढत्या महागाईच्या दबावामुळे, करदात्यांना आशा आहे की ही रक्कम वार्षिक १५ लाख रुपयांपर्यंत वाढेल अशी आशा आहे. २०२६ च्या अर्थसंकल्पापूर्वी जुन्या कर प्रणालीचे भविष्य देखील चर्चेत आहे. कलम ८०सी, कलम ८० डी, गृहकर्ज व्याजावरील कलम २४ (ब) आणि एनपीएस सारखे फायदे अनेक वर्षांपासून अपरिवर्तित राहिले आहेत.

तज्ज्ञांच्या मते या अर्थसंकल्पात जुनी कर प्रणाली रद्द करण्याबाबत निर्णय होऊ शकतो. लोकांना कर स्लॅब आणि सवलतींव्यतिरिक्त आयकर नियमांचे सुलभीकरण, जलद





परतावा आणि त्रासमुक्त प्रक्रिया हवी आहे. आयटीआर प्रक्रियेतील विलंब, एआयएसमधील त्रुटी, टीडीएसशी संबंधित समस्या आणि वारंवार सूचना देणे हे पगारदार व्यक्ती, फ्रीलांसर आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी प्रमुख समस्या आहेत, त्यामुळे याबाबत घोषणा होण्याची शक्यता आहे.

**● आरोग्य क्षेत्र !**

यंदाच्या अर्थसंकल्पापूर्वी, कलम ८० सी मर्यादा १.५ लाख रुपयांवरून वाढवण्याची आणि कलम ८० डी अंतर्गत आरोग्य विमा सूट वाढवण्याची मागणी होत आहे. विमा प्रीमियम आणि वैद्यकीय खर्च वाढत असल्याने करदात्यांना सवलत हवी आहे. त्यामुळे याबाबत घोषणा होऊ शकते. तसेच भारतातील आरोग्य सेवा क्षेत्रात गुंतवणूकीबाबत या अर्थसंकल्पात घोषणा होण्याची शक्यता आहे.

**● ऑटोमोबाइल !**

या अर्थसंकल्पात सरकार इलेक्ट्रिक वाहन (एत) बाजारपेठेला धोरणात्मक पाठिंबा देईल अशी अपेक्षा आहे. ऑटो कंपन्या एत घटकांवरील शुल्क सुलभीकरण आणि कमी करण्याची मागणी करत आहेत. ग्राहकांना एत खरेदी करण्यासाठी प्रोत्साहीत करणे आणि देशात चार्जिंगच्या पायाभूत सुविधा मजबूत करण्यासाठी महत्त्वाचे पाऊल उचलले जाण्याची शक्यता आहे.

**● संरक्षण क्षेत्र !**

केंद्र सरकारने देशाला स्वावलंबी बनवण्यावर भर दिला आहे. काही अहवालानुसार, संरक्षण, महत्त्वपूर्ण खनिजे, पॉवर इलेक्ट्रॉनिक्स, पायाभूत सुविधा आणि परवडणारी घरे यासारख्या प्रमुख क्षेत्रांना २०२६ च्या अर्थसंकल्पात प्राधान्य मिळू शकते. या भागावर मोठ्या प्रमाणात खर्च केला जाण्याची शक्यता आहे.

**● रेल्वे !**

यंदाच्या अर्थसंकल्पास रेल्वे प्रवाशांसाठी गुड न्यूज मिळण्याची शक्यता आहे. केंद्र सरकार ज्येष्ठ नागरिकांना उपलब्ध असलेल्या कोविड-१९ पूर्वीच्या तिकीट भाड्यातील सवलती पुन्हा सुरू करण्याचा निर्णय घेण्याची शक्यता आहे. तसेच सरकार अंदाजे ३०० नवीन गाड्या सुरू करण्याची घोषणा देखील करण्याची शक्यता आहे. तसेच रेल्वेच्या पायाभूत सुविधा मजबूत करण्यासाठी देखील निर्णय होण्याची शक्यता आहे.

# रॉंग साईडने वाहने लावणाऱ्यांवर कारवाई

## ३३ वाहनांवर २२,३०० रुपयांचा दंड



**अक्षराज : प्रमोद डफळ**

**दि.३०, राहुरी (अहिल्यानगर) :** अहिल्यानगर–मनमाड महामार्गाचे काम सुरू असल्याने राहुरी शहरात एकेरी वाहतूक व्यवस्था लागू करण्यात आली आहे. मात्र काही वाहनचालकांकडून नियमांकडे दुर्लक्ष करून रॉंग साईडने वाहने लावली जात असल्याने वारंवार वाहतूक कोंडी होत आहे. याच पार्श्वभूमीवर राहुरी पोलीस स्टेशनच्या वाहतूक विभागाने गुरुवार, दि.३० जानेवारी २०२६ रोजी रॉंग साईडने वाहने टाकणाऱ्या वाहनचालकांविरोधात कारवाई केली.

या कारवाईत एकूण ३३ वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्यात येऊन २२ हजार ३०० रुपये दंड वसूल करण्यात आला आहे. रॉंग साईडने वाहने लावल्यामुळे वाहतूक जाम होऊन सामान्य नागरिकांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत असल्याचे आढळून आले.

यावेळी नागरिकांना आवाहन करण्यात आले की, शहरातील एकेरी वाहतूक व्यवस्थेचे काटेकोरपणे पालन करावे. कोणतेही वाहन रॉंग साईडने उभे करू नये. नियमांचे उल्लंघन केल्यास दंडात्मक कारवाईला सामोरे जावे लागेल, असे आवाहन राहुरी पोलीस स्टेशन वाहतूक विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

सदरची कारवाई मा. सोमनाथ घारगे, पोलीस अधीक्षक, अहिल्यानगर, सोमनाथ वाकचौरे, अप्पर पोलीस अधीक्षक, श्रीरामपूर, जयदत्त भवर, उपविभागीय पोलीस अधिकारी, श्रीरामपूर विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कारवाईत पोलीस निरीक्षक संजय ठेंगे (राहुरी पोलीस स्टेशन) तसेच वाहतूक शाखेचे सहाय्यक फौजदार भाऊसाहेब आव्हाड, पोलीस हवालदार ठोंबरे व दरेकर यांनी सहभाग घेतला.

# अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालय बॉम्बने उडवून देण्याची पुन्हा धमकी...



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.३०, अहिल्यानगर :** अहिल्यानगर जिल्ह्याचे प्रशासन केंद्र असलेल्या अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयाला दुसऱ्यांदा पुन्हा एकदा बॉम्बने उडवून देण्याची धमकी मिळाल्याने खळबळ उडाली आहे. आज दुपारी तीन वाजेच्या सुमारास कार्यालयाच्या अधिकृत मेलवर हा धमकीचा संदेश धडकला.

घटनेचे गांभीर्य ओळखून पोलिसांनी तातडीने सूत्रे हलवली असून, 'बॉम्ब शोधक व नाशक' पथकाकडून परिसराची कसून तपासणी सुरू आहे. विशेष म्हणजे, यापूर्वीही अशाच प्रकारे धमकी देण्यात आली होती. या वारंवार मिळणाऱ्या धमक्यांमुळे सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला असून पोलीस प्रशासनाने तपासाची चक्रे वेगवान केली आहेत. अशा प्रकारच्या धमक्या येणे हे योग्य नसल्याचे नागरिकांमध्ये चर्चा होत आहे. यावर प्रशासनाने कठोर अशी भूमिका घेतली पाहिजे की, जेणेकरून अशा प्रकारचे धाडस करण्याची कुणाची हिंमत होणार नाही.

# २ फेब्रुवारी रोजी 'राष्ट्रीय एकात्मता दौड' चे आयोजन

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.३०, चंद्रपूर :** चंद्रपूर महानगरातील सर्व शैक्षणिक संस्था व महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने येत्या २ फेब्रुवारी २०२६ रोज सोमवार ला स्थानिक गांधी चौक ते जटपूरा गेट पर्यंत सकाळी ८ वाजता भव्य 'राष्ट्रीय एकात्मता दौड' चे आयोजन करण्यात आले आहे.

या राष्ट्रीय एकात्मता दौड ला तिरंगी झेंडा दाखवून सहभागी होण्यासाठी विविध क्षेत्रातील मान्यवर, प्रशासकीय अधिकारी कलावंत आणि खेळाडू उपस्थित राहणार आहेत. लोहपुरुष सरदार वल्लभभाईजी पटेल, जननायक बिरसाजी मुंडा यांच्या जयंतीला १५० वर्षे पुर्ण होत आहेत. तसेच भारतीय स्वातंत्र्य संग्रामातील प्रेरणास्त्रोत असलेले ' वंदे मातरम ' या गीत रचनेलाही १५० वर्षे पूर्ण होत आहेत. या १५० वर्षाच्या गौरवशाली इतिहासाला देशभरात विविध कार्यक्रम आयोजित करुन साजरे केले जात आहे.

यानिमित्त चंद्रपूर या ऐतिहासिक शहरात राष्ट्रीय एकात्मता व स्वातंत्र्य चेतना महोत्सव अंतर्गत विव्ध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. येत्या २ फेब्रुवारी रोज सोमवार ला सकाळी ८ वाजता महानगरातील विद्यार्थी व चंद्रपूरकर राष्ट्रीय एकात्मता दौड मध्ये सहभागी होणार आहेत तथा महानगरातील महाविद्यालय स्तरावर निबंध स्पर्धा घेतल्या जाणार आहेत. तर दि. ५ फेब्रुवारी रोज गुरुवार ला स्थानिक प्रियदर्शिनी इंदिरा गांधी सभागृहात देशभक्तीपर आधारित समूह नृत्य स्पर्धा तसेच देशभक्तीपर आधारित समूहगीत गायन स्पर्धा, अशा आंतरमहाविद्यालयीन स्पर्धांचे आयोजन केल्या गेले आहेत. या स्पर्धांमध्ये महानगरातील सर्व महाविद्यालयातील विद्यार्थी सहभागी होणार आहेत.

# चिंताजनक विमान दुर्घटना !



२८ जानेवारी रोजी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या विमानाला झालेल्या भीषण अपघातात त्यांचे दुर्दैवी निधन झाले. अजितदादा पवार यांच्या निधनाने संपूर्ण महाराष्ट्रावर शोककळा पसरली त्यांच्या निधनाने महाराष्ट्राचे कधीही भरून न निघणारे नुकसान झाले. त्यांच्यासारखा विकासाची दृष्टी असलेला नेता विमान अपघाताने हिरावून घेतल्याने महाराष्ट्र काही वर्ष मागे गेला. त्यांचे निधन ही महाराष्ट्रासाठी मोठी हानी आहे. अर्थात विमान अपघातात मृत्यू झालेले अजितदादा हे पहिले नेते नाहीत याआधीही अनेक नेत्यांना विमान अपघाताने हिरावून नेले आहे. मागील वर्षी जून महिन्यात सरदार वल्लभभाई पटेल आंतरराष्ट्रीय विमानतळावरून लंडनच्या दिशेने निघालेले बोईंग ७८७ – ८ हे विमान उड्डाणानंतर अवघ्या ३१ सेकंदात मेघानीनगर येथील नागरी वस्तीत कोसळल्याने झालेल्या भीषण अपघातात गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रूपाणी यांच्यासह २७५ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला होता. या भीषण अपघाताने देखील सर्वांचेच मन हेलावले होते. हे विमान बी जे मेडिकल कॉलेजच्या हॉस्टेलवर कोसळल्याने त्या हॉटेलमधील ३४ विद्यार्थ्यांचाही दुर्दैवी अंत झाला होता. दोन वर्षापूर्वी जेजू एअरचे बँकॉक ते मुआन या मार्गावरचे विमान कोसळून भीषण अपघात झाल होता. या अपघातात विमान भस्मसात होऊन १७९ प्रवाशी दगावले होते. २०२३ साली ऐन संक्रातीच्या दिवशी नेपाळमध्ये एक मोठी दुर्घटना घडली होती. नेपाळमधील प्रमुख शहरांपैकी एक असलेल्या पोखर या शहराजवळ एक प्रवाशी विमान कोसळून झालेल्या अपघातात ६० हुन अधिक प्रवाशांचा दुःखद अंत झाला होता. अहमदाबाद येथे झालेला विमान अपघात हा विमानात तांत्रिक बिघाड झाल्याने झाल्याचे सांगण्यात आले होते. अजितदादांच्या विमानाला झालेल्या अपघाताचे कारण शोधण्याची विनंती महाराष्ट्र सरकारने केंद्र सरकारकडे केली आहे. या अपघाताची सखोल चौकशी लवकरच होईल आणि त्यात या अपघाताचे खरे कारण समोर येईल. बहुतेक विमान अपघात हे खराब हवामानामुळेच झाल्याचे सिद्ध झाले आहे. खरे तर उड्डाणापूर्वी प्रत्येक वैमानिकाला हवामानाचा अंदाज सांगितला जातो. या आधारावर तो आपली रणनीती ठरवत असतो. या विमानाचे सारथ्य करणारे वैमानिक आणि सहवैमानिक दोघेही अनुभवी होते. त्यामुळे त्यांच्याकडून चूक झाली असावी असे वाटत नाही अर्थात विमान अपघातात केवळ वैमानिकाचीच चूक असते असे नाही. पक्षी विमानाला धडकून अपघात झाल्याच्याही अनेक घटना घडल्या आहे. ऐनवेळी इंजिनमध्ये बिघाड झाल्याने अपघात होतात. वातावरणात बदल झाल्यानेही अपघात होतात. वातावरणाची दृश्यमानता अचानक कमी होऊन अपघात घडल्याच्याही घटना घडल्या आहेत. वातावरणाची दृष्यमानता कमी असेल तर वैमानिक उड्डाण करत नाहीत. अर्थात पर्वतीय भागात दृष्यमानता कमी असतेच. डोंगराची कमी, जास्त उंची असल्याने आणि सतत बदलणारे हवामान, धुके यामुळे अपघात होण्याची शक्यता असते मात्र अलीकडे अद्ययावत संगणक प्रणाली असल्याने विमान किती उंचावरून जात आहे. हवामानात काय बदल घडत आहे याचा अंदाज वैमानिकांना येतच असतो तरीही काही वैमानिक अतिआत्मविश्वासाने विमान उड्डाण करतात. हवामानाची पर्वा न करता स्वतःसह प्रवाशांचा जीव धोक्यात घालतात. तांत्रिक कारण, खराब हवामान, पक्षाची धडक कारण काहीही असले तरी विमान अपघातात ज्या प्रवाशांचा जीव जातो तो मात्र परत येत नाही. अलीकडे विमान अपघातांचे प्रमाण खूप वाढले आहे. १९७० पासून आजवर ११ हजारांहून अधिक लहानमोठे विमान अपघात झाले असून त्यात ८३ हजारांहून अधिक प्रवासी मृत्युमुखी पडले आहेत. हा आकडा चिंताजनक आहे. आपल्या देशातही विमान अपघातात अनेक लोकांना जीव गमावावा लागला आहे. त्यात अनेक राजकीय आणि महनीय व्यक्तींचा समावेश आहे. काँग्रेस नेते संजय गांधी, माजी केंद्रीय मंत्री माधवराव सिंधिया, लोकसभेचे तत्कालीन अध्यक्ष आणि तेलगु देसमचे नेते जी एम सी बालयोगी, मेघालयाचे ग्रामीण विकास मंत्री सायप्रियम संगमा, हरियाणाचे ज्येष्ठ नेते ओमप्रकाश जिंदाल, अरुणाचल प्रदेशचे मुख्यमंत्री दोरजी खांडू, आंध्रप्रदेशचे मुख्यमंत्री वाय एस राजशेखर रेड्डी, गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रूपानी हे त्यातील काही महत्वाची नावे आहेत. त्यात आता अजितदादा पवार यांच्या नावाचीही भर पडली आहे. चार वर्षापूर्वी भारताचे पहिले चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ ( सिडीएस ) जनरल बिपीन रावत यांचे एका हेलिकॉप्टर अपघातात निधन झाले होते. विमान अपघातात अशा मोठ्या व्यक्तींचे निधन होणे ही देशाची मोठी हानी आहे. केवळ मोठे सिलिब्रेटीच नव्हे तर सर्वसामान्य प्रवाशांचा जीव देखील तितकाच महत्वाचा आहे. सर्वसामान्य मध्यमवर्गीय नागरिकांसाठी तर विमान प्रवास हे स्वप्न असते आणि जर असे अपघात झाले तर त्या स्वप्नांचीच नव्हे तर त्याच्या संपूर्ण कुटुंबाचीच राखरांगोळी होते त्यामुळे असे अपघात होणार नाही याची काळजी संबंधित यंत्रणेने घ्यायला हवी.

**– श्याम ठाणेदार**
**९९२२५४६२९५**

## विकासाचा गवताळ मार्ग

मराठवाड्यातील महत्त्वाचा जिल्हा अशी बीडची ओळख. दुष्काळ, ऊसतोडणी मजूर पुरवणारा जिल्हा अशी बीडची एक ओळख. यापलीकडे धार्मिक तसेच पर्यटनदृष्ट्या अनेक महत्त्वाची ठिकाणे जिल्ह्यात आहेत. परळी येथील ज्योतिर्लिंग वैद्यनाथ मंदिर, धर्मापुरीजवळील केदारेश्वर मंदिर, धारूरचा किल्ला, सौताडा रामेश्वर, राक्षसभुवन, अंबाजोगाईची योगेश्वरी देवी. मराठी साहित्यशारदा व मराठी जनांच्या दृष्टीने अंबाजोगाई हे महत्त्वाचे ठिकाण आहे. आद्यकवी मुकुंदराज यांनी ‘विवेकसिंधू’ हा आद्यग्रंथ याच परिसरात लिहिला. कवी दासोपंतांची भूमी म्हणूनही अंबाजोगाईची ओळख आहे. असा मोठा पौराणिक, ऐतिहासिक, सांस्कृतिक वारसा बीड जिल्ह्याला लाभलेला आहे.

यासोबतची एक ओळख जरा वेगळी आहे. मराठवाड्यात राहणाऱ्या लोकांना रानात, शेतात वाट चुकून भेदरलेले हरीण, जीव वाचवत पळणारा ससा दिसला की त्याचे अप्रूप वाटते. शेळीचा फडशा लांडग्याने पाडला की त्याची गावभर चर्चा होते. गेल्या काही वर्षांत बिबळ्याही दर्शन देतो आहे. बीडमध्ये मोरांसाठी एकमेव संरक्षित अभयारण्य अशी देशभर ओळख असलेले नायगाव (ता. पाटोदा) येथील मयूर अभयारण्य प्रसिद्ध आहे. ३५० हेक्टरवर पसरलेल्या या अभयारण्यात मोर मोठ्या प्रमाणात आहेत. ८ डिसेंबर १९९४ रोजी हे क्षेत्र नायगाव मयूर अभयारण्य नावाने संरक्षित केले. एकूणच वन्यजीवांविषयी मराठवाड्यात मोठे आकर्षण आहे.

त्यातूनच कुरणवाडी (ता. अंबाजोगाई, जि. बीड) येथे उपलब्ध असलेल्या गवताळ भागावर ‘ग्रास लँड सफारी’चे उद्घाटन नुकतेच झाले. बहुदा मराठवाड्यातील हा पहिलाच प्रकल्प असावा. विस्तीर्ण गवताळ प्रदेशातील (माळरान) वन्यजीव व तेथील विशिष्ट परिसंस्थेचा अभ्यास व आनंद घेण्यासाठी आयोजित केलेली सहल म्हणजे ‘ग्रास लँड सफारी’. त्यात उघडे गवताळ प्रदेश, काटेरी झुडपे आणि माळराने असतात. ती लांडगे, कोल्हे व सरपटणाऱ्या प्राण्यांसाठी उपयुक्त असतात. केवळ पर्यटनासाठी नव्हे, तर गवताळ प्रदेशातील जैवविविधतेचे संवर्धन करणे आणि स्थानिकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे असा या सफारीमागचा उद्देश असतो. महाराष्ट्रात पुणे, सातारा, सोलापुरात अशा सफारी उपलब्ध आहेत. त्यात आता कुरणवाडीची भर पडली आहे. वन व निसर्ग पर्यटक, अभ्यासक यांना त्यातून पुढील काळात संधी निर्माण होतील. स्थानिक रोजगारातही वाढ होऊ शकते.

अंबाजोगाई परिसरात मोठ्या प्रमाणावर गवताळ जमीन आहे. तिथे पक्षी, प्राण्यांचा अधिवास आहे. दोन बिबट, हरीण, काळवीट, नीलगायी असल्याच्या नोंदीवरून हे अधोरेखित होते. हा अधिवास वाढावा, त्याचे संवर्धन व्हावे, यासाठी ‘ग्रास लँड सफारी’ सुरू करावी, अशी भूमिका मंडित आमदार नमिता मुंदडा यांनी त्यासाठी पुढाकार घेतला आणि त्याला यश आले. ३३ काळविटे सोडून ‘ग्रास लँड सफारी’चे उद्घाटन झाले. पुढील काळात पर्यटक व निसर्ग अभ्यासकांना दोन ते अडीच तास ही सफारी करता येईल. त्यासाठी गाड्यांची सुविधाही पुरविली जाणार आहे. महत्त्वाचे म्हणजे हा परिसर देखरेखीखाली आल्यानंतर परिसरातील शेतकऱ्यांना मोर, हरीण व अन्य प्राण्यांपासूनचा त्रास कमी होण्यास मदत होईल. हे प्राणी ग्रास लँडमध्ये अन्न, पाणी मिळाल्यानंतर तिथेच थांबतील. परिणामी शेतीचे नुकसान टळेल.

‘ग्रास लँड सफारी’ प्रकल्पामुळे बीड जिल्ह्यातील पर्यटनास आणखी बळकटी येईल. नवीन इकोसिस्टीम उभारण्यासाठी हे सकारात्मक पाऊल असेल. त्यासाठी बीड जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींना श्रेयवाद दूर ठेवून सरकारी पातळीवर पाठपुरावा करावा लागेल. राज्य व केंद्र सरकारकडून ‘ग्रास लँड सफारी’साठी विशेष सुविधा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी बीडमधील निसर्गप्रेमींचा एक अभ्यासगट स्थापणे गरजेचे आहे. या गटाकडून देशातील प्रमुख ‘ग्रास लँड सफारी’चा अभ्यास दौरा करावा. त्यानंतर त्यांच्याकडून येणाऱ्या सूचनांच्या पूर्तीसाठी बीडकरांनी पुढाकार घ्यावा. असे झाल्यास कुरणवाडी ग्रास लँड सफारीचा प्रकल्प आणखी समृद्ध होईल, यात शंका नाही.

# ‘मराठी’ समृद्ध केव्हा होणार ?




प्रत्येकाला आपापल्या मातृभाषेचा अभिमान हा असायलाच हवा. मातृभाषाच आपल्याला ज्ञान देते, समृद्ध करते, व्यवहारिक जगात जगायला शिकवते. नुकत्याच झालेल्या महापालिका निवडणुकीत राज्यात मराठीचा मुद्दा चांगलाच गाजला. शहरी भागाचा विचार करता गेल्या काही वर्षांत शैक्षणिक क्षेत्रात मराठीची मोठ्या प्रमाणात घसरण झाली आहे हे सत्य नाकारता येणार नाही. दिवसागणिक तयार होणाऱ्या खासगी शिक्षण संस्था आणि त्यांच्यवर असलेला राजकीय वरदहस्त, ’चांगले शिक्षण हवे तर खासगी शिक्षणाला आणि त्यातही इंग्रजीला पर्याय नाही’ हे जनमानसांत बिंबवण्यामध्ये शिक्षण संस्थांना आलेले यश, मराठी शाळांचा घसरता दर्जा, सरकारकडून मराठीला समृद्ध करण्यासाठी केले जाणारे तोकडे प्रयत्न अशी अनेक कारणे आहेत ज्यामुळे मराठीची महाराष्ट्रातच पीछेहाट होऊ लागली आहे.

आज मराठी भाषेला महाराष्ट्रातच घरघर लागली आहे याचे कारण आपलाच व्यवहारातील मराठीचा वापर कमी होत चालला आहे. एकीकडे मराठी शाळा बंद पडू लागल्या आहेत, तर दुसरीकडे इंग्रजी माध्यमांच्या आणि कॉन्व्हेंट शाळांना अच्छे दिन आले आहेत. पाल्यांवर लहानपणापासून इंग्रजीची सक्ती करून आपण केवळ मराठीला डावलतो आहोत असे नव्हे, तर पाल्यांचा बौद्धिक विकासही खुंटत आहोत हे आपल्या केव्हा लक्षात येणार ? जेव्हा व्यवहाराची आणि शिक्षणाची भाषा एक असते तेव्हाच त्या भाषेचे वैभव आणि त्यातील शब्दसंपदा, खऱ्या अर्थाने आपल्या लक्षात येऊन ती भाषा आपल्या भाव भावना व्यक्त करण्याचे, संवेदना जाणून घेण्याचे, विचार व्यक्त करण्याचे साधन बनते. आजमितीला चारचौघांत इंग्रजी भाषेत संभाषण साधने प्रतिष्ठेचे समजले जाते. प्रतिष्ठेची ही व्याख्या आपणच तयार केली आहे ना ? आपल्याला फारसे इंग्रजी येत नाही म्हणून महाराष्ट्रात मराठी माणूस न्यूनगंड बाळगू लागला आहे. इंग्रजी भाषेत अस्खलित बोलण्यास शिकवणाऱ्या शिकवण्या जागोजागी तयार होऊ लागल्या आहेत त्यामध्ये मोठ्या संख्येने मराठी तरुणच दिसून येतात. ही गरज कोणी निर्माण केली ? शाळांमध्ये मुलांना भरती करण्याआधी त्यांच्या पालकांना इंग्रजी येते का हे पाहण्यासाठी प्रथम पालकांच्या मुलाखती घेतल्या जातात. अनेक मोठ्या कंपन्यांमध्ये नव्याने नोकरीस लागणाऱ्या मराठी माणसाला आज इंग्रजी मुलाखतीला सामोरे जावे लागते. साधे सिम कार्ड घ्यायचे झाले, तरी त्याचा अर्ज इंग्रजीत भरावा लागतो. महाराष्ट्रात कुठल्याही क्षेत्रात आणि कोणत्याही संदर्भात निवेदन द्यायचे असेल किंवा अर्ज भरायचे असतील, तर त्यासाठी प्रथम पर्याय मराठीचाच असायला हवा ही सक्ती महाराष्ट्रात का केली जात नाही.

आज मॉल किंवा सुपर मार्केट या ठिकाणी ग्राहकांशी नीट संवाद साधता यावा यासाठी हिंदी आणि इंग्रजी चांगले येणाऱ्या तरुण तरुणींना नोकरीवर ठेवले जाते त्यासाठी त्यांना अधिक वेतन दिले जाते त्यामुळे अशा ठिकाणी मराठी मुलांना नोकऱ्या मिळत नाहीत. ही स्थिती कोणी निर्माण केली ? महाराष्ट्रात राहायचे तर मराठी यायलाच पाहिजे. नीट बोलता नाही आले, तरी मराठी समजायला तर हवेच. दोन वर्षांपूर्वी फळविक्रेत्याला मराठीत संवाद साधण्याचा आग्रह धरणाऱ्या एका मराठी तरुणाला मुंब्र्यात मारहाण केली गेली, माफी मागण्यास भाग पाडले गेले, त्याचा व्हिडीओ बनवून समजमाध्यमावर व्हायरल केला गेला, एव्हढे होऊनही सरकार काही जागे झालेच नाही. सोसायटीमधील मराठी रहिवाशांना अन्य अमराठी भाषिकांकडून घरात घुसून शिवीगाळ आणि मारहाण केली जाते तरी मारहाण करणाऱ्याच्या विरोधात तत्परतेने गुन्हा दाखल केला जात नाही, मराठीचा आग्रह धरणाऱ्यांवर दादागिरी केली जाते, मुंबई केवळ महाराष्ट्राची नाही त्यामुळे तिथे मराठीची सक्ती चालणार नाही अशी उर्मट विधाने राजकीय मंडळींकडून केली जातात. महाराष्ट्रात मराठी भाषिकांवर अशीच दडपशाही होत असेल, मराठी भाषेची अशीच अवहेलना केली जात असेल तर मराठी माणसांनी न्याय तरी कोणाकडे मागायचा? आपल्या भाषेविषयी आपले प्रेम लोप पावत चालल्याचे हें परिणाम आहेत. आपल्या मातृभाषेला आलेल्या या अवकळेला आपण मराठी भाषिकच कारणीभूत आहोत. आपल्या मातृभाषेविषयी आपली अशीच उदासीनता राहिली, तर पुढच्या पिढीवर मातृभाषेचे संस्कार तरी कसे होतील ? आज मराठी शाळा बंद पडू लागल्या आहेत.

घरोघरी आई, बाबा, काका, मामा या गोड नात्यांची जागा आता मम्मा, डॅडा, आंटी, अंकलने घेतली आहे. मुलांना असे म्हणण्यास पालकांकडूनच प्रवृत्त केले जात आहे. मराठी सणांचे महत्व कमी होऊन फेब्रुवारीतील ’डेज’ उत्साहाने साजरे होऊ लागले आहेत, नाताळात घरोघरी ख्रिसमस ट्री येऊ लागले आहेत, मराठी घरात नववर्ष गुढीपाडव्यापेक्षा एक जानेवारीला अधिक उत्साहाने साजरे होऊ लागले आहे. घरोघरी वाढदिवस हिंदू कालगणनेनुसार तिथींना नव्हे तर इंग्रजी तारखांना साजरे होऊ लागले आहेत. मराठी भाषेला जपायचे असले तर सर्वप्रथम मराठी संस्कृती आणि मराठी अस्मिता जपणे अधिक महत्वाचे आहे आणि त्याची सुरुवात प्रत्येक मराठी माणसाने स्वतःपासून आणि आपल्या कुटुंबापासून करायला हवी. मराठी भाषेला अभिजात दर्जा तर मिळाला मात्र त्यानंतर राज्यात मराठी भाषा वाढवण्याचे आणि समृद्ध करण्याचे, मराठी रक्षणाचे जे प्रयत्न व्हायला हवेत ते मात्र अद्यापही दिसून येत नाहीत.

**– सौ. मोक्षदा घाणेकर,**
**काळाचौकी, मुंबई**

## श्रध्दांजली




प्रियतम माणसाला
श्रध्दांजली वाहता
अक्ष बांध फोडोनि
अश्रु प्रवाह वाहता

रे कलेवर सरणावर
अधिक मज दाहता
भोवताल कोलाहल
निपचितकसे राहता

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

ताजी फुले मलुलली
गेलाआपला चाहता
गर्दी महापूर लोटला
तरी निःशब्द शांतता

मौनातबुडाले सगळे
कुणासकाय सांगता
महोत्सव अर्ध्या वरी
करी अंतिम सांगता

जमले आप्त मित्र रे
अलिप्त कसे राहता
एकला चाले यात्रेला
मागे राहिला रे जथा

खरीठरते का नेमकी
आर्त निधनाची वार्ता
बढाया करे मोठाल्या
माणूस ठरतो नाकर्ता

**– हेमंत मुसरीफ पुणे.**
**९७३०३०६९९६.**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## अजितदादांच्या जाण्याने अहिल्यानगरच्या चौथीतील विराजचे स्वप्न अधुरेच!



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.३०, पारनेर (अहिल्यानगर) :** पारनेर तालुक्यातील दुर्गम भागातील धोत्रे खुर्द जिल्हा परिषद शाळेतील चौथी वर्गातील विद्यार्थी विराज सुभाष सासवडे याने मागील वर्षी झालेल्या हस्ताक्षर स्पर्धेत जिल्ह्यात व्दितीय क्रमांक मिळवून शाळेचा व गावाचा नावलौकिक वाढवला होता. या उल्लेखनीय यशाची दखल घेत अजितदादा पवार यांनी विराज व त्याच्या शिक्षकांना भेटीसाठी खास आमंत्रण दिले होते. या भेटीची विराजला मोठी उत्सुकता होती; अजितदादांना प्रत्यक्ष भेटणे हे त्याच्या लहानशा मनातील मोठे स्वप्न होते. मात्र अजितदादांच्या अकाली जाण्याने हे स्वप्न अधुरेच राहिले. या वर्षीही विराज सासवडे चा तालुक्यात प्रथम क्रमांक आला.जिल्हास्तरावर प्रथम क्रमांक आल्यावर शिक्षक व वर्गातील सर्व मित्रांना घेवून मुंबईला दादांकडे जायचे आश्वासन गेल्या १५ दिवसांपासून तो सर्वांना देत होता.स्पर्धा अवघ्या दोन दिवसांवर आल्या असतानाच दादांच्या निधनाच्या बातमीने विराजसह शाळेतील छोटया छोट्या मुलांची मनं हळवी झाली.

आज त्यांच्या जाण्याने मुलांच्या डोळ्यात अश्रू आणि मनात एक शांत प्रश्न होता –

आता आम्हाला स्वप्न दाखवणारे दादा कोण?अजितदादांचे प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व, विद्यार्थ्यांप्रती असलेली आपुलकी आणि गुणवंतांचे कौतुक करण्याची त्यांची भूमिका विराजसारख्या अनेक विद्यार्थ्यांसाठी प्रेरणास्थान होते. त्यांच्या जाण्याने केवळ राजकीय नव्हे, तर शिक्षकांमध्ये हळहळ व्यक्त होत आहे. विराजच्या यशाला अजितदादांनी दिलेले प्रोत्साहन पुढील पिढ्यांसाठी प्रेरणा देत राहील, अशी भावना शिक्षक सचिन ठाणगे व नंदा चेमटे यांनी व्यक्त केली.

## सुशिला शंकरराव गाढवे महाविद्यालयाचा आर्यन साळवे राज्यस्तरावर उत्तेजनार्थ



**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.३०, खंडाळा (सातारा) :** किसन वीर महाविद्यालय वाई आयोजित देशभक्त किसन वीर राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेत सुशिला शंकरराव गाढवे महाविद्यालयाचा आर्यन निलेश साळवे राज्यस्तरावर उत्तेजनार्थ क्रमांक पटकावला आहे. आर्यन याने आजची तरुणाई:व्यवस्था, अपेक्षा आणि वास्तव या विषयावर अभ्यासपूर्ण मांडणी केली. अंतिम फेरीत ऐन वेळी दिलेला विषय कॉलेज कट्टा विषयावर संदर्भासहित आपले विचार व्यक्त केले. स्पर्धेसाठी प्राचार्य डॉ.हणमंत जाधव यांचे प्रोत्साहन मिळाले. यासोबत प्रा.डॉ.प्रतिभा पाटणे, प्रा.प्रतिक्षा माने, प्रा.अमीर इनामदार यांनी विशेष मार्गदर्शन केले. या यशाबद्दल महाविद्यालयाचे वतीने शाल, ग्रंथ भेट देऊन आर्यन साळवेचा यथोचित सन्मान करण्यात आला. खंडाळा विभाग शिक्षण समितीचे संस्थापक अध्यक्ष शंकरराव गाढवे, उपाध्यक्ष सुरेश पवार, सचिव संजीव गाढवे, सर्व संचालक मंडळ, सदस्य, कार्यालयीन अधीक्षक प्रकाश जाधव, संतोष गाढवे, रासेयो अधिकारी प्रा.प्रदिप मेंढापुरे, प्राध्यापक प्रतिनिधी प्रा.शर्मिला सावंत, विज्ञान विभागप्रमुख प्रा.रविशा शिंदे,प्रा.रोहिणी मोरे, ग्रंथपाल प्रा.अर्चना राऊत तसेच सर्व प्राध्यापक वृंद, विद्यार्थी-विद्यार्थिनी, कार्यालयीन कर्मचारी आदींनी आर्यनचे अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या.

## भारतीय कृषी विद्यालयाचा साई ढबाले यांना जिल्हास्तरीय स्पर्धेमध्ये सुवर्णपदक



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.३०, नागपूर :** नागपूर येथील झिंगाबाई (टाकळी) परिसरातील गीता नगरातील भारतीय कृषी विद्यालयाच्या इयत्ता पाचवी मध्ये शिकणारा साई अमोल ढबाले याने नागपूर विद्यापीठाच्या क्रीडा पटांगणावर झालेल्या १२ वर्ष वयोगटात झालेल्या ६० मीटर धावण्याच्या स्पर्धेमध्ये प्रथम प्राप्त करून सुवर्णपदक प्राप्त केले. तसेच उंच उडी मध्ये दृतीय क्रमांकाचे रौप्य पदक प्राप्त केले. या यशाचे श्रेय त्याने आपले आईवडील, क्रीडा शिक्षक व शिक्षकांना दिले आहे. विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब पन्नासे, सचिव राकेशभाऊ पन्नासे, मुख्याध्यापिका अर्चना पन्नासे, पर्यवेक्षिका दीपिका तुपकर व सर्व शिक्षक व शिक्षत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन केलेले आहे.

## चंद्रपूरमध्ये लोहारा जंगल सफारी गेटचे उदघाटन




**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.३०, चंद्रपूर :** चंद्रपूर वनविभागाअंतर्गत चंद्रपूर परिक्षेत्रात येत असलेल्या लोहारा येथे आदिवासी विकास मंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. अशोक उईके यांच्यै हस्ते लोहारा जंगल सफारी गेटचे उदघाटन करण्यात आले. यावेळी आमदार सुधीर मुनगंटीवार, मुख्य वनसंरक्षक आर. एम. रामनुजम, जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी. मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंह, पोलीस अधिक्षक मुम्मका सुदर्शन, मनपा आयुक्त अकुनूरी नरेश, ताडोबा प्रकल्पाचे क्षेत्र संचालक डॉ. प्रभूनाथ शुक्ला, उपसंचालक (कोर) आनंद रेड्डी, उपवनसंरक्षक योगेश वाघाये, विभागीय वन अधिकारी राजन तलमले, लोहाराच्या सरपंच किरण सिध्दार्थ आदी उपस्थित होते.

लोहारा जंगल सफारी पर्यटन गेटद्वारे वन-वन्यजीव व्यवस्थापन करणे, मानव व वन्यजीव यांच्यात सहजीवन प्रस्थापित करणे, वनांचे शाश्वत जतन करुन लोकांचे वनावरील अवलंबन कमी करणे व वनाच्या माध्यमातून ग्रामीणांना रोजगार उपलब्ध करून देणे, जुनेरस्ते व कुपरस्ते यांचा वापर करुन ३५ किमीचा परिसर पर्यटनासाठी उपलब्ध करण्यात आला आहे. सदर क्षेत्रात एकूण १५ कृत्रिम पाणवठे व नैसर्गिक लोहारा तलावाचा समावेश आहे.या क्षेत्रात वाघ, बिबट, रानगवे, अस्वल, रानमांजर, मुंगुस, मसण्याउद, सायाळ, रानडुक्कर हे प्राणी तसेच विविध प्रकारची झाडे, पक्षी व विविधरंगी फुलपाखरे यांचा समावेश आहे.

# नियम न पाळणाऱ्या ७ बांधकामांवर स्टॉप वर्क ची कारवाई

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.३०, नवी मुंबई :** महानगरपालिका कार्यक्षेत्रातील तुर्भे विभागांतर्गत उच्च न्यायालय, मुंबई यांनी स्वत:हून दाखल करून घेललेली (Suo Moto) जनहित याचिका क. ३/२०२३ मध्ये, दिनांक २४ डिसेंबर २०२५ रोजी दिलेल्या आदेशानुसार शहरातील वाढत्या वायू प्रदूषणावर तात्काळ व प्रभावी उपाययोजना राबविण्याचे स्पष्ट निर्देश दिलेले आहेत.त्या अनुषंगाने, नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये बांधकामाच्या ठिकाणी सुरु असलेल्या कामांमुळे होणाऱ्या ध्वनी प्रदूषण, वायू प्रदूषण व ब्लास्टिंग करीता अवलंबवायची 'मानक कार्यप्रणाली (Standard Operating Procedure - SOP)' व बांधकाम प्रकल्पांच्या साईटवर होणाऱ्या वायू व ध्वनी प्रदूषण दंडात्मक कारवाईबाबतची नियमावली मानक कार्यप्रणाली अन्वये दंडात्मक शुल्क भरणा करणेबाबत संबंधित विकासक / बांधकाम धारकांस कळविण्यात आलेले होते.

तसेच ध्वनी / वायू प्रदूषण नियंत्रणाकरीता आवश्यक उपाययोजना केल्याबाबत खातरजमा करूनच काम करण्यात यावे. तसेच बांधकाम स्थळच्या सभोवताली ५०० मीटर पर्यंतच्या परिसरात व रस्त्यांवर धूळ प्रदूषण होऊ नये याची काटेकोरपणे दक्षता घ्यावी अन्यथा सुरु असलेले बांधकाम त्वरित बंद करण्याची कार्यवाही (स्टॉप वर्क) करण्यात येईल अशा आशयाच्या नोटीसा संबंधित विकासक / बांधकाम धारक यांना बजाविण्यात आलेल्या आहेत.




तथापि, महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी दि. २४ जानेवारी २०२६ रोजी सुरु असलेल्या बांधकाम / विकास कामाच्या ठिकाणी पाहणी केली असता सदर पाहणीमध्ये पुढीलप्रमाणे त्रूटी आढळून आलेल्या होत्या.

१. बांधकाम प्रकल्पाच्या परिघाभोवती किमान ३० फूट उंच टिन धातूचे पत्रे लावणे आवश्यक असताना प्रकल्पावर त्यापेक्षा कमी उंचीचे टिन धातूचे पत्रे आढळून आले.

२. बांधकाम सुरु असलेल्या इमारतींना सर्व बाजूने हिरव्या कापडाच्या ओल्या ज्यूट शीटच्या ताडपत्रीने बंद केलेले आढळून आलेले नाही.

३. बांधकामाच्या ठिकाणी साहित्य लोडींग आणि अनलोडींग करताना वॉटर फॉगींग केले जात नाही.

४. बांधकाम मजुरांनी मास्क, गॉगल्स, ॲप्रॉन इ, परिधान केलेले आढळून आले नाही.

५. बांधकाम स्थळाच्या सभोवतालच्या ५०० मीटर पर्यंतच्या परिसरात व रत्यांवर धूळ प्रदुषण होऊ नये याकरिता पाणी फवारणी यंत्र कार्यान्वित असल्याचे आढळून आले नाही.

६. घनमाती / बांधकाम साहित्य इत्यादी वाहतूक करताना हिरव्या कपड्याने झाकलेले आढळून आले नाही.

७. या पाहणी दरम्यान बांधकाम स्थळाच्या ठिकाणी कोणीही जबाबदार प्रतिनिधी / व्यवस्थापक उपस्थित नव्हते.हवा प्रदूषणात होणाऱ्या वाढी संदर्भात उच्च न्यायालय, मुंबई यांची स्वतःहून दाखल करून घेतलेली जनहितार्थ याचिका क्र. ३/२०२३ च्या आदेशान्वये धूळ व प्रदूषण रोखण्याकरिता विकासक / बांधकाम धारक यांचेमार्फत तातडीने उपाययोजना करणेबाबत आवश्यक आहे. परंतू या बाबत योग्य उपाययोजना केल्या नसल्याचे निदर्शनास आले.

त्यानुसार, दि. २७ जानेवारी २०२६ रोजी खालील बांधकामे / विकास कामांच्या साईट्स सीलबंद करण्यात आलेल्या आहेत.१. मे. साई अमृत बिल्डर्स, भुखंड क्र. १६ व १७, सेक्टर २०, सानपाडा, नवी मुंबई.२. मे. मेट्रीक्स बिल्डर्स, भुखंड क्र. १०, सेक्टर १९, सानपाडा , नवी मुंबई.३. मे. प्रोग्रेसिव्ह डेव्हलपर्स, भुखंड क्र. १२, सेक्टर २०, सानपाडा, नवी मुंबई.४. मे. कामधेनु ग्रीन, भुखंड क्र. ६ व ७, सेक्टर १९, सानपाडा, नवी मुंबई.५. मे. रॉयल पाम So>ìhbng© ¦PVG Ventures LLP, भुखंड क्र. ९इ, सेक्टर २०, सानपाडा, नवी मुंबई.तसेच दि. २९ जानेवारी २०२६ रोजी खालील बांधकामे/विकास कामांच्या साईट्स सीलबंद करण्यात आलेल्या आहेत.

१. मे. कामधेनु लाईफ स्पेस, भुखंड क्र. १८ व २५, सेक्टर- ८, सानपाडा, नवी मुंबई.

२. मे. सत्यम लाईफ स्पेस, भुखंड क्र. ०७, सेक्टर १६ए, सानपाडा, नवी मुंबई.सदर मोहिम महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या आदेशान्वये, अति. आयुक्त डॉ. राहुल गेठे व अतिक्रमण उपआयुक्त डॉ. कैलास गायकवाड, यांचे मार्गदर्शनाखाली, तुर्भे विभागाचे सहाय्यक आयुक्त सागर मोरे, यांचे नियंत्रणाखाली, तुर्भे विभागातील स्वच्छता अधिकारी जयेश पाटील, कनिष्ठ अभियंता विनोद आंब्रे व इतर अधिकारी, कर्मचारी यांच्या उपस्थितीमध्ये राबविण्यात आली.

या मोहिमेसाठी अतिक्रमण निर्मूलन पथकातील पोलीस अधिकारी, अंमलदार आणि अतिक्रमण विभागातील सुरक्षारक्षक देखील तैनात ठेवण्यात आले होते. यापुढील काळात नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील वायू प्रदूषण रोखण्याकरिता सर्वच विभाग कार्यालय क्षेत्रात कारवाई अधिक तीव्र करण्यात येणार आहे.

# वासुंद्यात गाजली शाश्वत क्रिकेट चषक स्पर्धा

## क्रिकेटच्या मैदानावर झळकले ग्रामीण तरुणांचे कौशल्य

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.३०, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील वासुंदे येथे शाश्वत ब्रिगेड टीमच्या वतीने आयोजित शाश्वत प्रोफेशनल क्रिकेट चषक २०२६ ही क्रिकेट स्पर्धा मोठ्या उत्साहात पार पडली. इंजि. किरण झावरे यांच्या नेतृत्वाखाली साठे मैदानावर झालेल्या या स्पर्धेत पुणे-नगर जिल्ह्यातून ३२ संघांनी सहभाग घेतला. ही जिल्हास्तरीय स्पर्धा राज्यस्तरावर गाजली.

स्पर्धेत तेजस्विनी ताई उगले प्रतिष्ठान, टाकळी ढोकेश्वर संघाने प्रथम क्रमांक पटकावला आणि ५१,१११ रुपये बक्षिस मिळवले. द्वितीय क्रमांक शाश्वत ॲग्रो, वासुंदे (४१,१११/-), तृतीय मैत्री ग्रुप, मंचर (३१,१११/-) तर चतुर्थ हरेश्वर स्पोर्ट्स क्लब, कर्जुले हर्या (१५,५५५/-) यांनी पटकावला.

बक्षीस वितरण समारंभ जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजितराव झावरे पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. त्यांच्या उपस्थितीने स्पर्धेत अतिरिक्त उत्साह संचारला. प्रथम क्रमांक विजेत्या संघाचा त्यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. यावेळी युवा नेते अमोल उगले प्रफुल्ल झावरे (कबड्डीपटू) उपस्थित होते.

कार्यक्रमात डॉ. रवींद्र झावरे, डॉ. वैशाली झावरे (हरेश्वर हॉस्पिटल), पत्रकार शरद झावरे, इंजि. शिल्पा झावरे, इंजि. प्रसाद झावरे, समीर कंदलकर, आदर्श शिक्षक रामदास झावरे, वत्सला झावरे, उद्योजक बापूसाहेब गायखे, डॉ. बाबासाहेब गांगड हे प्रमुख मान्यवर होते.

आयोजनासाठी अक्षय गोडसे, विनायक झावरे, गणेश बर्वे, भूषण साठे, रूपेश साठे, बाळशिराम तळेकर, गणेश साळुंके, सिद्धांत किनकर, शुभम झावरे, सुनिल मधे, अनिल वाघ, पराग झावरे, हृषी जगदाळे, विष्णू झावरे आदींनी विशेष मेहनत घेतली. पंच म्हणून नवनाथ मधे व समालोचक सुनिल डोंगरे यांनी जबाबदारी पार पाडली. स्पर्धेचे लाईव्ह प्रसारण शिव लाईव्ह, आंबेगाव युट्युब चॅनेलवर झाले. परिसरातील क्रिकेटप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून स्पर्धेला प्रतिसाद दिला. ही स्पर्धा ग्रामीण भागातील क्रिकेटला चालना देणारी ठरली.




शाश्वत प्रोफेशनल क्रिकेट चषक २०२६ ग्रामीण भागातील तरुण क्रिकेटपटूंना व्यासपीठ देण्यासाठी आयोजित केली. ३२ संघांच्या उत्कृष्ट खेळाने स्पर्धा यशस्वी झाली. सुजित झावरे पाटील यांच्या मार्गदर्शनाने व सर्व आयोजकांच्या मेहनतीने ही स्पर्धा राज्यस्तरावर गाजली. भविष्यातही अशा स्पर्धा घेऊन क्रिकेटला चालना देऊ. क्रिकेट प्रेमींच्या उत्साहाने मन प्रफुल्लित झाले.

**- किरण झावरे**
**(अध्यक्ष : शाश्वत प्रोफेशनल स्पोर्ट्स क्लब)**

## चंद्रपूरात उद्या सर्वपक्षीय श्रद्धांजली सभा

### विविध सामाजिक संघटना सर्व राजकिय पक्ष आणि नागरिक वाहणार उपमुख्यमंत्री अजित पवार यांना श्रध्दांजली

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.३०, चंद्रपूर :** राज्याचे उपमुख्यमंत्री स्व.अजित पवार यांचे विमान दुर्घटनेत दु:खद निधन झाल्याची माहिती समोर आल्यानंतर संपूर्ण राज्यात शोककळा पसरली आहे. या पार्श्वभूमीवर चंद्रपूर शहरात शनिवार, दिनांक ३१ जानेवारी २०२६ ला सायंकाळी ६ वाजता गांधी चौक येथे जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ.प्रा.अशोक उईके यांच्या अध्यक्षतेत श्रद्धांजली सभेचे आयोजन करण्यात आले आहे. यात सर्वपक्ष, नागरिक आणि विविध सामाजिक संघटनेच्या वतीने उपमुख्यमंत्री अजित पवार यांना श्रद्धांजली अर्पण केली जाणार आहे. अजित पवार यांचे विमान अपघातग्रस्त झाले. या दुर्घटनेत त्यांचे निधन झाले. या घटनेमुळे राज्याच्या राजकीय, सामाजिक आणि प्रशासकीय क्षेत्रात तीव्र दुःख व्यक्त करण्यात येत आहे.

स्व.अजित पवार हे महाराष्ट्राच्या राजकारणातील एक प्रभावशाली नेतृत्व मानले जात होते. त्यांनी राज्याच्या विकासासाठी विविध महत्त्वपूर्ण निर्णय घेतले असून त्यांच्या नेतृत्वशैलीची दखल राजकीय वर्तुळात घेतली जात होती. त्यांच्या अकाली निधनामुळे राज्याच्या राजकारणात मोठी पोकळी निर्माण झाल्याची भावना व्यक्त केली जात आहे. चंद्रपूरात आयोजित करण्यात येणाऱ्या श्रद्धांजली सभेला सत्ताधारी व विरोधी पक्षांचे नेते, लोकप्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. यावेळी स्व.अजित पवार यांना श्रद्धांजली अर्पण करून मौन पाळण्यात येणार असून त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात येणार आहे.

## नमुंमपा द्वारे प्लास्टिक प्रतिबंधात्मक विशेष मोहीम

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.३०, नवी मुंबई :** केंद्रीय व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून प्राप्त सूचनांनुसार २२ ते २८ जानेवारी या कालावधीत एकल वापर प्लास्टिक बंदीच्या अनुषंगाने नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात प्लास्टिक प्रतिबंधात्मक विशेष मोहीमा राबवून ६५ हजार दंडात्मक रक्कम वसूली तसेच १८ किलो प्लास्टिक पिशव्यांचा साठा जप्त करण्यात आला आहे. २२ जानेवारी २०२६ पासून सर्व विभाग कार्यालय क्षेत्रात प्लास्टिक पिशव्या व एकल वापर प्लास्टिक तपासणी मोहीम महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार, अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार व घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ.अजय गडदे आणि परिमंडळ १ विभागाचे उपआयुक्त सोमनाथ पोटरे व परिमंडळ २ विभागाचे उपआयुक्त संजय शिंदे यांच्या नियंत्रणाखाली प्रभावीपणे राबविण्यात आली. यामध्ये बेलापूर विभागात दोन व्यावसायिकांकडून रु.१० हजार दंडात्मक रक्कम वसूली आणि १ कि.ग्रॅ. प्लास्टिक पिशव्यांचा साठा जप्त करण्यात आला. नेरुळ विभागातही एका व्यावसायिकाकडून रु.५ हजार दंडवसूली आणि २ कि.ग्रॅ. प्लास्टिक पिशव्यांचा साठा तसेच वाशी विभागात एका व्यावसायिका कडून ५ हजार दंडात्मक रक्कम वसूली आणि १ कि.ग्रॅ. प्लास्टिक पिशव्यांच्या साठ्याची जप्ती करण्यात आली. तुर्भे विभागात दोन व्यावसायिकांकडून रु.१० हजार दंडवसूली आणि ६ कि.ग्रॅ. प्लास्टिक पिशव्यांचा साठा जप्ती आणि कोपरखैरणे विभागात रु.५ हजार दंड वसूली व १ कि.ग्रॅ प्लास्टिक पिशव्यांची जप्ती करण्यात आली. घणसोली विभाग कार्यालयामार्फत चार व्यावसायिकांकडून रु.२० हजार दंड वसूली आणि ७ कि.ग्रॅ प्लास्टिक पिशव्यांचा साठा तसेच परिमंडळ २ च्या भरारी पथकामार्फत रु.१० हजार दंडात्मक रक्कम वसूली आणि १.५ कि.ग्रॅ. प्लास्टिक पिशव्यांचा साठा जप्त करण्यात आलेला आहे. प्लास्टिक पिशव्यांचा वापर नागरिकांकडून पूर्णपणे टाळला जावा याकरिता नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत विविध माध्यमातून जनजागृती करण्यात येत असून त्यासोबतच प्रोजेक्ट मुंबई संस्थेच्या सहयोगाने प्लास्टिकमुक्त नवी मुंबई अभियानांतर्गत विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. तरी नागरिकांनी आपल्या दैनंदिन वापरातून प्लास्टिक पिशव्या व एकल वापर प्लास्टिकला हद्दपार करावे आणि कापडी पिशव्यांचा पर्याय स्विकारावा असे करण्यात येत आहे.

# दोन दिवसीय विदर्भस्तरीय शिक्षक मेळावा

## ३१ जानेवारी व १ फेब्रुवारी रोजी संत नगरी शेगाव येथे होणार मेळावा

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.३०, चंद्रपूर :** राज्यातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या ज्वलंत विषयांवर चर्चा करून त्यावर प्रभावी उपाययोजना करता यावी म्हणून विदर्भस्तरीय शिक्षक मेळावा ३१ जानेवारी व १ फेब्रुवारी २०२६ रोजी संतनगरी शेगाव (जि.बुलढाणा) येथील गणेश प्रस्थ मंगल कार्यालयामध्ये आयोजित करण्यात आलेला आहे. या मेळाव्यामध्ये राज्यातील सर्व शिक्षक- शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सरसकट जुनी पेन्शन योजना लागू करावी, राज्यातील आयटीआय निदेशकांच्या विविध समस्या, टीईटी संदर्भात शासनाचे धोरण व त्याबाबत शिक्षकांमध्ये असलेला संभ्रम, राज्यातील आदिवासी आश्रम शाळाम धील शिक्षक- शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित सम स्या, टप्पा वाढ अनुदान, नक्षलग्रस्त, आदिवासी भागाम ध्ये कार्यरत असणाऱ्या शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना एकस्तर पदोन्नती व वाढीव घरभाडे भत्ता लागू करण्यात यावा. तसेच १५ टक्के नक्षलग्रस्त भत्ता सहाव्या व सातव्या वेतन आयोगानुसार अदा करण्यात यावा, अंशतः अनुदानित शाळा तुकडीवर कार्यरत शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना वैद्यकीय सवलत, अर्जित रजा रोखीकरण व शाळेला वेतनेत्तर अनुदान मंजूर करणे, याशिवाय शिक्षक कर्मचाऱ्यांची प्रलंबित असलेली विविध देयके शालार्थ आयडी प्रकरणे, अनुकंपा तत्त्वावर नियुक्ती तसेच त्यांचे शालार्थ आयडी प्रकरणे, विनाअनुदानित तुकडी वरून अनुदानित अनुदानित तुकड्यावर कर्मचाऱ्यांची नियुक्ती करणे या व अशा अनेक समस्यावर सविस्तर मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

३१ जानेवारीला सायं. ५ वाजता कार्यकर्ता परिसंवाद होणार आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आ. सुधाकर अडबाले, उद्घाटक म्हणून माजी आमदार व्ही. यू. डायगव्हाणे, प्रमुख पाहुणे म्हणून प्रांतीय अध्यक्ष अरविंद देशमुख, तर परिसंवादावर वक्ते म्हणून दिलीप कडू, जयदीप सोनखासकर, राजेश खडबडे, प्रमोद मुनेश्वर, रामदास खवशी मार्गदर्शन करणार आहेत. तर दिनांक ०१ फेब्रुवारी २०२६ रोजी विदर्भस्तरीय शिक्षक म ेळाव्याचे उद्घाटन तथा संघर्ष स्मरणिका प्रकाशन समारंभ सकाळी ११.३० वाजता होणार आहे.

या शिक्षक मेळाव्याला उद्घाटक आ.धीरज लिंगाडे, अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षक महामंडळाचे सरचिटणीस तथा माजी आमदार व्ही.यू. डायगव्हाणे, मार्गदर्शक विमाशि संघाचे सरकार्यवाह तथा आ.सुधाकर अडबाले, स्मरणिका प्रकाशन शुभहस्ते आ.संजय खोडके, स्वागताध्यक्ष माऊली ग्रृपचे अध्यक्ष ज्ञानेश्वर पाटील, प्रमुख पाहूणे आ.ॲड.अभिजीत वंजारी, आ.रामदास मसराम, विमाशि संघाचे प्रांतीय अध्यक्ष अरविंद देशमुख, मेस्टाचे राज्याध्यक्ष डॉ.संजय तायडे पाटील, महा.राज्य आयटीआय निदेशक संघटनेचे सल्लागार भोजराज काळे, महाराष्ट्र आश्रम शाळा शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी संघटनेचे राज्य सरचिटणीस किसन पुंड, आदिवासी आश्रम शाळा शिक्षक संघटनेचे राज्य अध्यक्ष डॉ.डी.एल.कराड, महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन संघटनेचे राज्याध्यक्ष वितेश खांडेकर, राज्य सरचिटणीस आशुतोष चौधरी व अमरावती शिक्षक मतदार संघाचे विदर्भ माध्यमिक शिक्षक संघटनेचे अधिकृत उमेदवार दिलीप कडू आदी मान्यवर उपस्थित राहणार असून म ार्गदर्शन करणार आहे.

या मेळाव्यादरम्यान नागपूर विभागाचे शिक्षक आम दार तसेच संघटनेचे सरकार्यवाह सुधाकर अडबाले यांनी मागील तीन वर्षांमध्ये शैक्षणिक क्षेत्रामध्ये केलेले भरीव कार्य यावर 'संघर्ष' या स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात येणार आहे. या शिक्षक मेळाव्यामध्ये दिग्गज शिक्षक आमदाराचे मौलिक मार्गदर्शन मिळणार असल्याने विदर्भातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी बंधू-भगिनींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन संघटनेचे प्रांतिय उपाध्यक्ष रमेश काकडे, जयप्रकाश थोटे, जयदीप सोनखासकर, विजय ठोकळ, विभागीय कार्यवाह बाळासाहेब गोटे, चंद्रशेखर रहांगडाले, कोषाध्यक्ष भूषण तल्हार यांच्यासह जिल्ह्यातील सर्व पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

# थोडक्यात

## भानेगाव-पारशिवनी 'टी-पॉईंट'वर आता 'पोर्टेबल सिग्नल'अपघातांच्या मालिकेला बसणार आळा



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२९, नागपूर :** जबलपूर-छिंदवाडा राष्ट्रीय महामार्गाला जोडणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग २४७ वरील भानेगाव-पारशिवनी टी-पॉईंट हा वाहनधारकांसाठी 'डेथ ट्रॅप' ठरत होता. मात्र, वाढता धोका लक्षात घेता कामठी विभाग वाहतूक पोलिसांनी एक महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. पोलिसांनी या ठिकाणी पोर्टेबल सिग्नल कार्यान्वित केला असून सुसाट वेगाने धावणाऱ्या वाहनांच्या वेगावर मर्यादा येणार आहे. जबलपूर छिंदवाडा राष्ट्रीय महामार्गाला जोडणारा राष्ट्रीय महामार्ग २४७ हा दहेगाव (रंगारी), खापरखेडा, भानेगाव आणि कामठी या परिसरातून जातो या मार्गावर लहान मोठ्या जड वाहनांची मोठी वर्दळ असते विशेषतः भानेगाव उड्डाणपुलापासून अवघ्या ५० मीटर अंतरावर भानेगाव पारशिवनी टी-पॉईंट आहे. उड्डाणपुलावरून येणारी वाहने सुसाट वेगाने येत असतात यातील अनेक वाहने भानेगाव पारशिवनी टी-पॉईंटवरून वळण घेऊन जबलपूर तर काही कामठीच्या दिशेने जातात. भानेगाव उड्डाणपूल परिसर व भानेगाव पारशिवनी वळणावर डझनाच्या वर अपघात झाले आहेत, यात अनेकांचा मृत्यू देखील झाला आहे तर काही गंभीर जखमी झाले आहेत. वाढत्या अपघातांची दखल घेत कामठी विभाग वाहतूक पोलिसांनी तातडीने उपाययोजना म्हणून पोर्टेबल सिग्नल बसवला आहे. या सिग्नलमुळे भानेगाव उड्डाणपुलावरून येणाऱ्या वाहनांच्या वेगावर नियंत्रण बसेल शिवाय भानेगाव पारशिवनी टी-पॉईंटवर वळण घेणाऱ्या वाहनांना सुरक्षित रस्ता मिळेल.

## महाराष्ट्राचा बुलंद आवाज हरपला; खापरखेड्यात अजितदादांना सर्वपक्षीय भावपूर्ण श्रद्धांजली




**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२९, नागपूर :** महाराष्ट्राच्या राजकारणातील एक धडाडीचे नेतृत्व आणि राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे विमान अपघातात झालेले निधन ही संपूर्ण देशासाठी मनाला चटका लावून जाणारी घटना आहे. त्यांच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी कधीही भरून न निघणारी असल्याची भावना व्यक्त करत गुरुवार, दिनांक २९ जानेवारी २०२६ रोजी खापरखेडा येथील अन्नामोड येथे सर्वपक्षीय श्रद्धांजली सभेचे आयोजन करण्यात आले होते. अजितदादांच्या अकाली निधनामुळे संपूर्ण राज्यावर शोककळा पसरली आहे. खापरखेडा येथील या श्रद्धांजली सभेत भाजपा, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, आरपीआय, वंचित बहुजन आघाडी, बसपा, शिवसेना यांसह सर्वच राजकीय पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते, पत्रकार आणि सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी शोकसंवेदना व्यक्त करताना अनेक नेत्यांनी अजितदादांच्या कामाच्या पद्धतीचा आवर्जून उल्लेख केला. अजितदादा ऊर्जा मंत्री असताना खापरखेडा येथे आले होते, त्यावेळी त्यांनी स्थानिक प्रश्नांची दखल घेत चिचोली ग्रामपंचायत प्रशासनाला २५ लाख रुपयांचे अनुदान तात्काळ मंजूर केले होते. त्या एका निर्णयामुळे खापरखेडा शहराच्या विकासाला खऱ्या अर्थाने गती मिळाली,अशा शब्दांत उपस्थितांनी त्यांच्या कार्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली. दिलेला शब्द पाळणारा नेता म्हणून त्यांच्या आठवणींना उजाळा देण्यात आला. अजितदादा म्हणजे केवळ एक नेता नव्हते तर ते विकासाचे दुसरे नाव होते. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राने एक शिस्तप्रिय आणि कर्तव्यदक्ष मार्गदर्शक गमावला आहे अशी शोकांतिका अनेकांनी व्यक्त केली. सभेच्या शेवटी सर्व उपस्थितांनी दोन मिनिटे मौन पाळून लाडक्या नेत्याला आणि त्यांच्यासोबत अपघातात प्राण गमावलेल्या पाचही जणांना सामूहिक श्रद्धांजली अर्पण केली. अजितदादा 'अमर रहे' च्या घोषणा जड अंतकरणाने देण्यात आल्या.

## श्री खरवलीआई सेवा ट्रस्ट शिळगांवकडून स्वच्छता अभियान सप्ताहाला सुरुवात




**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.३०, शिळफाटा (ठाणे) :** शुक्रवार, दिनांक ३० जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ४ वाजता श्री. खरवलीआई सेवा ट्रस्ट शिळगांव कडून स्वच्छता अभियान सप्ताह ला सुरुवात झाली. दिनांक ३० जानेवारी ते ०५ फेब्रुवारी २०२६ पर्यंत अभियान चालू राहणार आहे. या सप्ताहामध्ये दररोज दोन तास देऊन श्री खरवलीआई परिसर स्वच्छ करण्याचा अभियान ट्रस्ट कडून घेण्यात आला आहे. कचऱ्याची विल्हेवाट, प्लास्टिक मुक्त, व्यसनमुक्त परिसर करण्यासाठी ट्रस्ट कडून पुढाकार घेण्यात आला आहे. तसेच ट्रस्टचे सचिव शरद पाटील यांनी येणाऱ्या भाविकांना सुद्धा आव्हान केला आहे. की आपण आपला परिसर आपला घर ज्या प्रकारे आपण स्वच्छ ठेवतो तसंच मंदिराच्या भागात जेव्हा आपण नवस फेडण्यासाठी येतो. त्यावेळी भाविकांनी सुद्धा आपला हातभार नेहमी लावून सहकार्य करावे. जेणेकरून मंदिर परिसर कायम स्वच्छ राहील येणाऱ्या भाविक भक्तांचं आरोग्य सुद्धा चांगलं राहील. आजपासून स्वच्छता अभियानामध्ये कळवा मुंब्रा वन विभागाचे अधिकारी, ग्रामस्थांनी, भाविक भक्तांनी, आणि ट्रस्टच्या सदस्यांनी सुद्धा सहभाग घेतला.

## नांदवी शासकीय प्राथमिक आश्रम शाळेत शैक्षणिक साहित्याचे वाटप



**अक्षराज : मितेश जाधव**

**दि.३०, पेण (रायगड) :** शासकीय प्राथमिक आश्रम शाळा नांदवी, जिल्हा रायगड येथे प्रज्योती पुस्तक पेढी जोगेश्वरी मुंबई व वासल्या ट्रस्ट कांजूरमार्ग मुंबई यांनी आश्रम शाळेतील मुलांना शैक्षणिक साहित्य चे वाटप केले. शासकीय प्राथमिक आश्रम शाळा नांदवी मुख्याध्यापक अनिल सूर्यवंशी यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रज्योती पुस्तक पेढी जोगेश्वरी मुंबई वासल्या ट्रस्ट कांजूरमार्ग मुंबई यांच्या माध्यमातून शाळेतील विद्यार्थ्यांना प्रति विद्यार्थी वह्या, पेन, रंगीत खडू पेन्सिल बॉक्स पाट्या चित्रकला वया स्केच पेन वॉटर कलर इत्यादी भरगोस शालेय उपयोगी शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. सदर कार्यक्रमासाठी शाळा व्यवस्थापन समिती मुख्याध्यापक अनिल सूर्यवंशी यांनी यावेळी प्रस्तावकांमध्ये बोलताना सांगितले. की शाळेसाठी आवश्यक असणाऱ्या भौतिक सुविधा तसेच शाळेच्या गरजा पूर्ततेसाठी आम्ही सदैव प्रयत्नशील राहू. आश्रम शाळा नांदवी शाळेला प्रज्योती पुस्तक पेढे जोगेश्वरी मुंबई व वासल्या ट्रस्ट कांजुर मार्ग मुंबई यांनी जे शैक्षणिक साहित्य विद्यार्थ्यांना दिले त्याबद्दल त्यांनी त्यांचे आभार मानले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक अनिल सूर्यवंशी यांनी केले. यांनी मान्यवरांचे आभार व्यक्त केले व कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## साहेब म्हणयं... शिका ना अ आ ई...



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.३०, नागपूर :** चेहर्यावर सुरकुत्या.... अन.... हातात पेन अन कागद. काहीसे असेच चित्र.... आज साक्षरता वर्गात प्रवेश करताना दिसले.....साहेब म्हणयं....शिका ना अ आ ई....... प्रकाश हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेज कान्द्री माईन येथे आज शिक्षणाधिकारी (योजना) आशिष चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली पथकाने साक्षरता वर्गाची पाहणी केली. २०२७ पर्यंत संपूर्ण साक्षरतेचा टप्पा गाठायचा आहे. त्या अनुषंगाने गावागावात शिक्षकांकडे निरक्षर व्यक्तींना कमाल ज्ञान देउन साक्षर करायचे आहे. प्रकाश हायस्कूल येथे चार असाक्षरांची नोंद असून आज साक्षर वर्गात दोन असाक्षर विद्यार्थी उपस्थित होते. यामध्ये फत्तुपतीराम कठोते (६२), अर्पणा कठोते (४८) यांचा समावेश होता. उपस्थित अधिकाऱ्यांनी असाक्षर वर्गाची पाहणी करून उपस्थितांशी संवाद साधला. मुख्याध्यापक मिलिंद वानखेडे यांनी असाक्षर वर्ग, नियोजन या संदर्भातील माहिती दिली. यावेळी शिक्षणाधिकारी (योजना) आशिष चव्हाण यांच्या समवेत गटशिक्षणाधिकारी विजय भाकरे, केंद्रप्रमुख प्रकाश महल्ले, मुख्याध्यापक मिलिंद वानखेडे, असाक्षरवर्गाचे कामकाज पाहणारे शिक्षक प्रशांत सरपाते उपस्थित होते.

## स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे आमरण उपोषण मागे



**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.३०, मुदखेड (नांदेड) :** शेतकऱ्यांच्या विविध प्रलंबित व जिव्हाळ्यांच्या मागणीसाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने आमरण उपोषण सुरू करण्यात आले होते. लोकप्रतिनिधी प्रशासनाच्या समन्वयातून सकारात्मक तोडगा काढून लेखी आश्वासन देण्यात आल्याने उपोषणकर्ते स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे तालुकाध्यक्ष प्रमोद पवार निवघेकर यांनी आमरण उपोषण मागे घेतले आहे. स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे तालुकाध्यक्ष प्रमोद व्यंकटराव पवार यांनी प्रजासत्ताक दिनापासून तहसील कार्यालयासमोर शेतकऱ्यांच्या प्रलंबित मागण्या संदर्भात आम रण उपोषण सुरू केले होते. शेतकऱ्यांच्या जनहिताच्या निगडित अत्यंत महत्त्वाच्या प्रश्नासाठी लोकप्रतिनिधी तसेच प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी आमरण उपोषणात बसले होते. यामध्ये शेतकऱ्यांना सिंगल फेजच्या माध्यमांतून २४ तास वीज पुरवठा मि ळावा ग्रामीण रस्त्याच्या प्रश्न मार्गी लावण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्यात यावा. वन्य प्राण्यांचे नुकसान टाळण्यासाठी प्रभावी संरक्षणात्मक उपायोजना राबवाव्यात शिवपांदण रस्ते, बांध रस्ते, मोकळे करून देण्यात यावे या प्रमुख मागण्या होत्या. चार दिवसांपासून सुरू असलेल्या आमरण उपोषणाशी दखल भोकर विधानसभा मतदार संघाच्या आमदार श्रीजया चव्हाण यांनी घेतली आहे. याबाबत संबंधित प्रशासनाशी चर्चा करून प्रश्न मार्गी लावण्याच्या सूचना दिल्या आहेत. आमदार श्रीजया चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक निलेश देशमुख बारडकर, माजी सभापती लक्ष्मण जाधव यांनी आमरण उपोषणकर्त्यांची भेट घेऊन चर्चा केली. नायब तहसीलदार मारोती जगताप यांनी उपोषण स्थळास भेट देऊन सकारात्मक चर्चा करत प्रश्न मार्गी लावण्याचे लेखी आश्वासन दिले आहे. आमदार श्रीजया चव्हाण यांच्या शेतकऱ्यांच्या आमरण उपोषणाची तातडीने दखल घेतल्याने प्रशासनाच्या सकारात्मक निर्णयातून अखेर उपोषण मागे घेण्यात आले आहे. यावेळी नायब तहसीलदार मारोती जगताप, निलेश देशमुख बारडकर, मारोतराव पवार, सरपंच प्रतिनिधी रमेश लखे, शाम राव लखे यांच्यासह आदींची उपस्थिती होती. लोकप्रतिनिधी व प्रशासनाने समन्वयातून तोडगा काढल्याने शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले आहे.

## उपमुख्यमंत्री कै.अजितदादा पवार यांना महात्मा फुले कृषि विद्यापीठात वाहिली श्रद्धांजली



**अक्षराज : प्रमोद डफळ**

**दि.३०, राहुरी (अहिल्यानगर) :** राहुरी विद्यापीठ, दि.३० जानेवारी, २०२६ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री कै.अजितदादा पवार यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी मुख्य प्रशासकीय इम ारतीसमोर शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.विलास खर्चे, विस्तार शिक्षण संचालक डॉ.गोरक्ष ससाणे, संशोधन संचालक डॉ.विठ्ठल शिर्के, अधिष्ठाता (कृषि) डॉ.सातापा खरबडे, नियंत्रक सदाशिव पाटील, विद्यापीठ अभियंता मिलिंद डोके, उपकुलसचिव (प्रशासन) विजय पाटील व सुरक्षा अधिकारी गोरक्ष शेटे उपस्थित होते. यावेळी कुलगुरू डॉ.विलास खर्चे श्रद्धांजली अर्पण करतांना म्हणाले की संपूर्ण महाराष्ट्रासह देशाला हादरा देणारी घटना घडली आहे. उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचा कृषि विद्यापीठांना फार मोठा आधार होता. ते कृषि शास्त्रज्ञांचे फार आदर करीत. त्यांची कामातील दुरदृष्टी, शिस्तबध्दता व कामाच्या वेगामूळे त्यांनी राज्यात नव्या उंचीवर नेऊन ठेवले. मी त्यांना विद्यापीठाच्या वतीने भावपूर्ण श्ध्दांजली अर्पण करतो असे यावेळी ते म्हणाले. यावेळी अजितदादा पवार यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून श्रद्धांजली वाहण्यात आली. याप्रसंगी विद्यापीठातील सर्व सहयोगी अधिष्ठाता, विभाग प्रमुख, प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महात्मा गांधी पुण्यतिथीनिमित्त अभिवादन आणि हुतात्म्यांना भावपूर्ण आदरांजली

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.३०, नवी मुंबई :** महानगरपालिकेच्या वतीने महात्मा गांधी पुण्यतिथी निमित्त प्रशासन विभागाचे उपआयुक्त किसनराव पलांडे यांच्या हस्ते महापालिका मुख्यालयातील ॲम्फीथिएटर येथे प्रतिमापूजन करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी सहा.आयुक्त स्वरुपा परळीकर, प्रशासकीय अधिकारी रवी जाधव व शोभा देशमुख तसेच इतर अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. त्याचप्रमाणे हुतात्मा दिनानिमित्त देशाच्या स्वातंत्र्यासाठी प्राणार्पण केलेल्या हुतात्म्यांच्या स्मरणार्थ आदरांजली व्यक्त करीत सकाळी ११.०० वा. ते ११.०२ वा. पर्यंत स्तब्ध उभे राहून दोन मिनिटे मौन पाळण्यात आले.

## ५ दिवसांचा बँकिंग आठवडा लागू करण्याची मागणी

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.३०, चंद्रपूर :** देशातील बहुतांश केंद्र व राज्य सरकारी कार्यालयांमध्ये ५ दिवसांचा कामाचा आठवडा लागू आहे. तसेच रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, इन्शुरन्स व जनरल इन्शुरन्स यासारख्या प्रमुख वित्तीय संस्थामध्येही ५ दिवसाचा आठवडा असताना, बँक कर्मचाऱ्यांना मात्र ६ दिवस काम करण्यास भाग पाडले जात असून, ५ दिवसांचा बँकिंग आठवडा लागू करण्याच्या मागणीसाठी बँक कर्मचारी संघटनेतर्फे दि.२७ जानेवारी २०२६ ला आंदोलन करण्यात आले. याच मागणीसाठी देशव्यापी संप व आंदोलनाचे आवाहन करण्यात आले असून, त्याचाच एक भाग म्हणून ' चंद्रपूर रिजन' अंतर्गत टप्प्याटप्प्याने निदर्शने आंदोलन करण्यात आले. पहिला टप्पा बँक ऑफ महाराष्ट्र, मुख्य शाखा, त्यानंतर स्टेट बँक ऑफ इंडिया, मुख्य शाखा, आणि शेवटी बँक ऑफ इंडिया, मुख्य शाखा येथे जोरदार निदर्शने करण्यात आली. या आंदोलनाचे नेतृत्व सर्व बँक कर्मचारी संघटनांचे पदाधिकाऱ्यांनी केले. या आंदोलनात दीपेन सोनी, सूरज शेंडे, राहुल वाकुळकर, राहुल चाणेकर, विवेक येसेकर, नंदू डांगे, कार्तिक वऱ्हाटे, आशू ओसावार, स्नेहल मोरे, महादेव कामतकर, व बँक कर्मचारी सहभागी झाले होते. मागण्या मान्य होईपर्यंत हा संघर्ष अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशाराही यावेळी संघटनेच्या वतीने देण्यात आला.